FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. ०८/१८ वर्ष २०१८ दिनांक ५/३/२०१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलमे Sections ७, १३(१)(ड) सह १३(२)
(ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections —

3. (a) अपराधाची घटना : वार ......, तारीख पासून १४/२/२०१८ वेळ ......, तारीख पर्यंत ५/३/२०१८ वेळ १६:३०
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २२/०२/२०१८ वेळ ......
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०२/२०१८, तारीख ६/३/२०१८ वेळ ६.१५
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव परिरक्षण चौकी, मनपा, आर/उत्तर विभाग, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव ......
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण दहिसर पूर्व मुंबई, गाव, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name बाबू अमीर शेख (b) वडिलांचे / पतीचे नाव अमीर शेख
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ६० वर्ष (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९८१९९१९६४८
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ......, दिल्याचा दिनांक ......, दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय झाडे तोडण्याचे कॉन्ट्रॅक्टर
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता मस-जिद कॉन्ट्रॅक्टर चाळ रू.नं-३८८ अन्सारी मोहल्ला व्ही.पी. रोड, अंधेरी(प)
गल्ली / सर्व्हे नं. घर / नाव नं. फोन / मो. नं. पॅन नं. व्होटर्स नं.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ......, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, पो. स्टे. ......
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ......, जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ......
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) राजेश सुधाकर परब, वय ४८, श्रमिक, म.न.पा. परिरक्षण चौकी, रा.ठि. डी/२१० मिरासदन मिरा रोड पूर्व
२) सदानंद मोहन चव्हाण, वय २५ वर्ष, उद्यान विद्या सहायक, म.न.पा. रा.ठि. ५१८/बी विंग ओम शिवमल्हो श्री सोसायटी, दहिसर (पश्चिम)

Y.P.P.-800 Req.-(25×6=150 Lvs)-8 2016-PA3-(K) 460

फिर्यादी नामे बाबु अमीर शेख, वय ६०, धंदा- झाडे तोडण्याचे कॉन्ट्रॅक्टर रा. ठि. मस-मच कॉन्ट्रॅक्टर चाळ, रू. नं. ३८८, अन्सारी मोहल्ला, सी.पी. रोड, अंधेरी पश्चिम यांचा स्वतंत्र पानावर टंकलीखीत केलेली फिर्याद हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(विजय यादव)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि मुंबई

ANTI CORRUPTION BUREAU MUMBAI (stamp)

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना यातील लोकसेवक राजेश परब व सदानंद चव्हाण यांनी झाडे तोडण्याची परवानगी दिली होती. त्याचा मोबदला म्हणून लोकसेवक चव्हाण यांनी रू. ३००००/- व लोकसेवक परब यांनी रू. ५०००/- इतक्या लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केलेनंतर यातील आरोपी परब यांना कायदेशीर परिश्रमाखेरीज रू. २००००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा कलम ७, १३(१)(५) सह १३(२) भ.प्र.अ. १९८८ अन्वये गुन्हा नोंद

..........

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] MAKHBABU.

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name विजय बळीराम यादव

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्याद दिनांक ०५.०३.२०१८

श्री शेख बाबु शेख अमिर वय ६० वर्षे, व्यवसाय– झाड तोडण्याचे कॉन्ट्रॅक्टर, रा.ठी. एस.एच. कॉन्ट्रॅक्टर चाळ, रू.नं. ३८८, अन्सारी मोहल्ला खोजा जमात खानाच्या पाठीमागे, व्ही.पी.रोड, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८ मोबाईल नं. ९८१९९१९६४८

.................................................................................................................................................................

मी माझे वरील पत्त्यावर माझे कुटुबियांसमवेत ४० वर्षापासुन रहात आहे. मी गेली ४३ वर्षापासून झाडे तोडण्याचे कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करतो. एखादया घराजवळील, इमारतीजवळील अथवा सोसायटीतील सुकलेले अथवा धोकादायक झाड तोडण्याचे कॉन्ट्रक्ट मी घेत असतो. मी जागा मालकाचा लेखी अर्ज व फोटो घेवून बी.एम.सी. मधून परमीशन घेवून त्याप्रमाणे संबंधित झाडे तोडीत असतो. यासाठी मला जागा मालक पैसे देत असतात. त्यावरच माझा उदरनिर्वाह चालतो. माझी पत्नी सौ. नसरीन माझे या कामात मला मदत करीत असते. या कामासंबंधी माझे तसेच माझे पत्नीचे महानगरपालिकेच्या दहीसर येथील गार्डन विभागात नेहमी जाणे येणे होत असे.

मे २०१७ मध्ये दहीसर येथील लायन एस.पी.जैन आय हॉस्पिटलचे प्रमुख सुरेश नरूला यांनी मला बोलावून सांगितले की, त्यांचे हॉस्पिटलचे आवारातील सुकलेल्या अशोकाची झाडे तोडावयाची आहेत. तेथे एकुण ८ झाडे होती त्यापैकी सुकलेली २ झाडे पूर्ण व इतर ६ झाडे अर्धी तोडावयाची असल्याचे सांगितले. सदर कामासाठी त्यांनी मला २५,०००/– रूपये दयावयाचे ठरले व त्या कामासाठी मुंबई महानगरपालिका मधून परवानगी आणणेपासून तोडलेल्या झाडाच्या जागी नवीन झाडे लावण्यापर्यंतची सर्व जबाबदारी त्यांनी मला दिली.

त्यानंतर मी सुरेश नरूला साहेबांनी दिलेला अर्ज, फोटो व इतर कागदपत्रे घेवून मी मुंबई महानगरपालिकेच्या दहीसर पूर्व येथील कार्यालयात जावून गार्डन विभागाच्या चव्हाण साहेबांना भेटलो. त्यांचे ऑफीसमध्ये तो अर्ज व कागदपत्रे मी जमा केली त्यानंतर त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे मी वेळोवेळी लायन हॉस्पिटलच्या सुरेश साहेबांकडून घेवून चव्हाण साहेबांकडे जमा केली. सदर कामासाठी मी तसेच माझी पत्नी असे चव्हाण साहेबांना भेटत होतो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, झाडे तोडून झाल्यावर मला रू. ३०,०००/– दयावे लागतील. माझ्याकडे दुसरे काम नसल्याने व मला कामाची गरज असल्याने मी त्यांच्या मागणीला होकार दिला. यावर त्यांनी दि. १४/०२/२०१८ रोजी झाडे तोडण्याच्या परवानगीचे पत्र दिले व त्यांच्या प्रतीवर त्यांनी माझी सही घेतली. सदरचे पत्र देतानाही चव्हाण साहेबांनी मला काम झाल्यावर रू. ३०,०००/– देण्यासाठी सांगितले. तसेच त्यांचे ऑफीसमधील शिपाई परब यानेही मला रू. ५०००/– ची मागणी केली. त्यावेळी चव्हाण साहेबांनी मला सांगितले की, ते तसेच पाटील साहेब व सागर साहेब असे तिघेजण रू. ३०,०००/– वाटून घेवू.

दि. २०/०२/२०१८ रोजी मी मजूर लावून लायन हॉस्पिटल दहीसर येथील आशोकाची वाळलेली सहा झाडे तोडली व तेथे दोन झाडे लावली व इतर झाडे लावणे बाकी होते. यानंतर मी काम झाले म्हणून सांगावयास चव्हाण साहेबांकडे गेलो असता त्यांनी मला झाड तोडण्याच्या परवानगीचे पत्र दिल्याबद्दल माझ्याकडे रू. ३०,०००/– ची मागणी केली तसेच शिपाई परब याने माझ्याकडे रू. ५०००/– ची मागणी केली. त्यांना लाच म्हणून पैसे द्यावयाची इच्छा नसल्याने मी गार्डन अधिकारी चव्हाण त्यांचे ऑफीसमधील साथीदार पाटील व सागर (पूर्ण नाव माहित नाही) तसेच शिपाई परब यांचे विरूध्द तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागात येवून माझी तक्रार दि.२२/०२/२०१८ रोजी सांगितली.

SHAKHBABC

त्यावर मला पो.नि. यादव यांनी लेखी तक्रार लिहून देण्याबाबत सांगितले असता मला लिहीता वाचता येत नसल्याने माझा जबाब मी सांगितल्याप्रमाणे दोन पंचा समक्ष पो.नि.यादव यांनी संगणकावर तयार केला. तो सरकारी पंच सुरज बाबुदास वैष्णव यांनी मला वाचून दाखविला. त्यानंतर दि. २३/०२/२०१८ रोजी ठरल्याप्रमाणे पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे पो.नि. यादव यांनी सांगितले त्याप्रमाणे पो.नि. यादव यांनी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये माझे व लोकसेवकाचे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, दोन शासकिय पंच व पोलीस पथक असे पोलीस वाहनाने चव्हाण व परब कार्यरत असलेल्या दहिसर (पूर्व), मुंबई येथे पंच श्री. अरविंद कांबळे यांच्यासह माझे शर्टाचे आतील बाजूस डिजिटल व्हाईस रेकॉर्डर लावून लोकसेवक श्री. चव्हाण व परब यांना भेटण्यास आलो असता ते कार्यालयात तब्येत ठिक नसल्याने मिळून आले नाहीत. परंतू लोकसेवक परब हे तेथे मिळून आले व त्यांनी रु. ५०००/– इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झाले.

त्यानंतर दि. २४/०२/२०१८ रोजी लोकसेवक चव्हाण भेटून न आल्याने पुन्हा पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे पो.नि. यादव यांनी सांगितले त्याप्रमाणे. त्यानंतर मी, दोन शासकिय पंच व पोलीस पथक असे पोलीस वाहनाने दहिसर (पूर्व), मुंबई येथे पंच श्री. अरविंद कांबळे यांच्यासह माझे शर्टाचे आतील बाजूस डिजिटल व्हाईस रेकॉर्डर लावून लोकसेवक श्री. चव्हाण व परब यांना भेटण्यास आलो असता तेथील कार्यालयास शासकीय सुट्टी असल्याने कार्यालय बंद आढळल्याने लोकसेवकांची भेट झाली नाही. त्यानंतर पो.नि. यादव यांनी लोकसेवक चव्हाण यांना फोन करण्यास सांगितले असता माझा मोबाईल क्र. ९६१९५५४६८३ वरुन लोकसेवक चव्हाण यांचा मोबाईल क्र. ८४२२४४००४९ वर फोन केला असता चव्हाण यांनी सोमवारी ऑफिसमध्ये येण्यास सांगितले.

त्यानंतर दि. २६/०२/२०१८ रोजी लोकसेवक चव्हाण यांनी भेटण्यास बोलावल्यावरुन पुन्हा पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे पो.नि. यादव यांनी सांगितले. त्यानंतर मी, दोन शासकिय पंच व पोलीस पथक असे पोलीस वाहनाने दहिसर व्हिलेज पूर्व येथे आलो. त्यानंतर पो.नि. यादव यांनी लोकसेवक कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका, परिरक्षण चौकी, आर/उत्तर विभाग, दहिसर (पूर्व), मुंबई येथे पंच श्री. अरविंद कांबळे यांच्यासह माझे शर्टाचे आतील बाजूस डिजिटल व्हाईस रेकॉर्डर लावून लोकसेवक श्री. चव्हाण यांना भेटण्यास आलो असता श्री. चव्हाण हे कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यावेळी त्यांचेबाबत चौकशी केली असता ते मिटींगकरीता हेड ऑफिस येथे गेल्याचे समजले. त्यानंतर पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे आतील बाजूस लावून पंच श्री. कांबळे यांचेसह पाठविले असता कार्यालयात लोकसेवक परब व चव्हाण यांची भेट झाली त्यावेळी परब यांनी लाचेची मागणी केली व श्री. चव्हाण यांनी उदया या साहेबांना विचारुन सांगतो असे सांगितले. यावर दि. २७/०२/२०१८ रोजी श्री. चव्हाण यांना भेटावयास जायचे ठरले. परंतू, नंतर परब किंवा चव्हाण यांचा फोन आल्यावरच जायचे असे ठरले.

त्यानंतर दि. ०१/०३/२०१८ रोजी परब याने मला फोन करुन पैशाबद्दल विचारले. यावर मी त्यांना होळी व रविवारची सुट्टी झालेनंतर सोमवारी दि. ०५/०३/२०१८ रोजी भेटतो असे सांगितले व सदरची बाब मी फोन करुन पो.नि. यादव यांना सांगितली. यावर त्यांनी सोमवारी पुन्हा परब व चव्हाण यांना भेटायला ऑफिसमध्ये जावूया असे ठरले.

त्यानंतर दि.०५/०३/२०१८ रोजी पो.नि. यादव यांनी फोनवर सांगितलयाप्रमाणे मी दहिसर स्पोर्टर्स फाऊंडेशन येथे हजर झालेनंतर माझे शर्टच्या आतील बनियनला रेकॉर्डर लावण्यात आला व मला

खबरदारीच्या सुचना दिल्या व लोकसेवकांची भेट घेतल्यानंतर परत याच ठिकाणी येण्यास सांगितले. पोलीस निरीक्षक यादव यांनी त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने छातीवर अडकविला. त्यानंतर मी व पंच अरविंद कांबळे हे तक्रारदार लोकसेवक श्री चव्हाण व परब याना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे गेले. त्यावेळी पोलीस निरीक्षक यादव, पो.नि.वेदपाठक पंच वैष्णव, व पोलीस स्टाफ हे सर्वजण वाहनातच थांबून राहिले. परंतू श्री. चव्हाण हे कार्यालयात उपस्थित नसल्यामुळे त्यांची भेट झाली नाही. तसेच कार्यालयातील इतर लोकसेवकांकडे चौकशी केली असता लोकसेवक श्री. चव्हाण व परब हे साईडवर गेल्याचे सांगून ते दुपारनंतर परत येतील असे त्यांनी मला सांगितले.

त्यानंतर मी व पंच श्री. अरविंद कांबळे हे जेथे शासकिय वाहन उभे होते सदर ठिकाणी परत आले.

त्यानंतर मी काही वेळ थांबून पुन्हा परब यांना यांच्या मोबाईल क्र. ९८९२५०३७३३ या क्रमांकावर संपर्क केला. त्यावेळी परब यांनी ते नुकतेच कार्यालयात हजर झाल्याचे सांगितले व कार्यालयात येण्यास सांगितले.

पोलीस निरीक्षक यादव यांनी त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियनला अडकविला. त्यानंतर मी व पंच अरविंद कांबळे हे तक्रारदार लोकसेवक श्री चव्हाण व परब याना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे गेले. त्यावेळी पोलीस निरीक्षक यादव, पो.नि.वेदपाठक पंच वैष्णव, व पोलीस स्टाफ हे सर्वजण वाहनातच थांबून राहिले.

आम्ही कार्यालयात गेल्यानंतर प्रथम लोकसेवक चव्हाण यांची भेट घेतली, त्यावेळी त्यांनी त्यांचे कामाचे संदर्भात चर्चा करून अगोदर सांगितल्याप्रमाणे रु. ३०,०००/– लाचेची रक्कम देण्यास सांगितले. तसेच मी काही बोलणार नाही तुमच्या इच्छेप्रमाणे दया असे सांगितले. त्यानंतर मी परब याची भेट घेवून चर्चा केली असता परब यांनी लोकसेवक चव्हाण यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रकमे व्यतिरिक्त स्वत:चे रू. ५०००/– वेगळे अशी लाचेची रक्कम मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व मी त्यास रक्कम कमी करण्याबाबत बोललो असता एकूण रु. ३००००/– मला आणून दे. मी साहेबांना माझे मी देतो असे सांगितले. व रु. ५०००/– माझे वेगळे दे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. अरविंद कांबळे हे जेथे शासकिय वाहन उभे होते तेथे परत आलो.

त्यानंतर पो.नि. यादव यांनी माझे चव्हाण व परब यांच्या मध्ये प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पोनि.वेदपाठक,मला व पंचाना ऐकविले असता, लोकसेवक चव्हाण व परब यांनी माझेकडे रू.३५,०००/– लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर पो.नि.यादव यांनी त्वरीत सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि.यादव यांनी पंचा समक्ष मला रुपये ३५,०००/– च्या लाचेच्या रक्कमेची व्यवस्था करण्यास सांगितले.

त्यावेळी मी माझेकडे सध्या तेवढी रक्कम नसल्याचे सांगितले. तसेच माझेकडे रोख रु. ५०००/–(रु. ५००/– दराच्या १० चलनी नोटा) होते. लोकसेवक माझेकडे लाचेची मागणी करणार व माझेकडे तेवढे पैसे नव्हते म्हणून मी आधीच रू. ५००/– दराच्या खेळण्यातील एकूण ३० नोटा असे एकूण खेळण्यातील रू.१५,०००/– च्या नोटाचे नियोजन केले होते.

WAKHBABC.

त्यानंतर पोनि. यादव यांचे सुचनेप्रमाणे वाहन चालक महारनूर यांनी माझेकडील असलेले रू. ५०००/– रू. ५००/– दराच्या १० भारतीय चलनी नोटा व रू.५००/– च्या खेळण्यातील एकूण ३० नोटांना कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रासिन पावडर लावली. त्यानंतर सदरच्या नोटांच्या बंडल एका न्युज पेपर मध्ये गुंडाळून सदर न्युज पेपरला ही कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या लाचेच्या रकमेसह फोल्ड केलेल्या न्युज पेपर हा महारनूर यांनी माझे शर्टच्या डाव्या खिशात पंचासमक्ष ठेवला.

त्यानंतर पोनि यादव यांच्या सुचनेनुसार मी माझे मोबाईल फोनवरून लोकसेवक परब यांना मोबाईल क्र.९८९२५०३७३३ यावर फोन करून पैशाची सोय झाली असून भेटण्याचे ठिकाण व वेळ विचारली असता, त्यांनी दहीसर पूर्व येथील एस.व्ही. रोड वरील रविंद्र हॉटेल येथे १० ते १५ मिनीटामध्ये भेटण्याचे सांगितले

त्यानंतर पोलीस निरीक्षक यादव यांनी त्यांच्याकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियनला छातीवर अडकविला. व त्यानंतर मी व पंच कांबळे असे भेटायला हॉटेल रविंद्र जवळ गेलो.

काही वेळाने लोकसेवक परब हे हॉटेल रविंद्र च्या गेटजवळ आले. त्यानंतर परब, पंच श्री. कांबळे व मी असे हॉटेलाच्या आत गेलो. सदर ठिकाणी परब यांनी लाचेच्या रक्कमेबाबत बोलणी केली असता, मी माझेकडे रू. २०,०००/– रक्कम जमा झाल्याचे सांगून रू. १५,०००/– चव्हाण यांना देवून रू. ५,०००/– परब यांचे असल्याचे सांगितले. त्यानंतर परब यांनी लाचेची रक्कम देण्याचे सांगितल्यानंतर मी उजव्या हाताने शर्टच्या डाव्या खिशात ठेवलेली न्युज पेपरमध्ये गुंडाळलेली लाचेची रक्कम रू. २०,०००/– लोकेसवक परब यांच्यास समोर धरली असता, लोकसेवक परब यांनी त्यांचे डाव्या हाताने रक्कम स्विकारून त्यांचे डाव्या बाजुच्या पॅन्टच्या खिशात ठेवली.

त्यानंतर काही वेळाने मी, पंच श्री. कांबळे व परब असे रविंद्र हॉटेलच्या बाहेर आलो व काही अंतर चालत गेल्यानंतर पूर्वनियोजित इशारा केल्यानंतर पोलीसांनी परब यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले.

पो.नि. यादव यांनी परब यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव राजेश सुधाकर परब, असे सांगितले.यावर पोलीसांनी परब याला राजेश्री थिएटरचे खालील एका चहाचे दुकानात नेले व त्यांनी सोबत आणलेल्या जांभळया रंगाच्या लाईटखाली परबची तपासणी करुन त्याचेकडून लाचेची रक्कम दोन्ही पंचांसमक्ष जप्त केली.

पोनि यादव यांनी परब यांना नमूद लाचेची रक्कम कोणासाठी स्विकारल्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी नमूद लाचेची रक्कम चव्हाण, यांच्यासाठी स्विकारले असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि यादव यांनी परब यांना स्वतःचे मोबाईल वरून चव्हाण यांना त्यांचे मोबाईल वर संपर्क करून लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत कळविण्यास सांगितले व सदरची रक्कम घेवून कार्यालयात येत असल्याचे सांगण्यास सांगितले. त्यावेळी परब यांनी त्यांचे मोबाईल फोनवरून लोकसेवक चव्हाण यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता, लोकसेवक चव्हाण आलोसे परब यांना स्विकारलेली लाचेची रक्कम स्वतःचे ताब्यात ठेवण्यास सांगितले.

तरी मला लायन एस.पी.जैन आय हॉस्पिटल येथील झाडे तोडण्याची परवानगी दिल्याबाबत काम झाल्यानंतर श्री. चव्हाण आणि श्री परब यांनी माझेकडे स्वतःसाठी लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे

MAKHIZAISC

कबूल केले आणि श्री. परब यांनी रुपये २०,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यामुळे माझी श्री. चव्हाण, श्री. परब यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद मला मराठीत वाचून समजावून सांगितली, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

Yadav

( विजय यादव )
पोलीस निरीक्षक,
लाप्रवि,मुंबई

SHAKHIZARC.

( शेख बाबू शेख अमीर )